# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
तार - EDUTECH E-mail : desk10@dte org.in Internet :http/www.dte.org.in


**परिपत्रक**

क्र.१०/एडीएम/पदविका/२०१३/ ६८७
दि. 8 AUG 2013

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
अमरावती/औरंगाबाद/मुंबई/नागपुर/नाशिक/पुणे.

**विषय : शासकीय/ अशासकीय अनुदानित व स्वायत्त संस्थामध्ये बारावी नंतर च्या प्रथम वर्ष पदविका अभ्यासक्रमातील समुपदेशन फेरीनंतर (तिसरी फेरी) रिक्त राहिलेल्या जागा संस्थास्तरावर भरणेबाबत...**

उपरोक्त विषयाच्या संदर्भात नमुद करण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मध्ये शासकीय/ अशासकीय अनुदानित व स्वायत्त संस्थेत बारावी नंतर प्रथम वर्ष पदविका अभ्यासक्रमात केंद्रिभुत प्रवेश प्रक्रियेनंतर काही जागा रिक्त आहेत.

त्याअनुषंगाने कळविण्यात येते की, सदर रिक्त जागा दि. १४.०८.२०१३ पर्यंत खालील अटीच्या अधीन राहुन भरण्याची परवानगी देण्यात येत आहे

१. संबंधित शासकीय/अशासकीय अनुदानित व स्वायत्त संस्थांनी त्यांच्या संस्थेतील रिक्त जागांची शाखानिहाय माहिती स्थानिक वृत्तपत्रांमधुन प्रसिध्दी देण्यात यावी व संस्थेचा नोटिस बोर्डावरसुध्दा प्रसिध्द करण्यात यावी.

२. तद्नंतर ज्या विद्यार्थ्यांनी केंद्रिभुत प्रवेश प्रक्रियेत अर्ज केलेले आहे अशाची गुणवत्ता यादी तयार करुन त्यांचे गुणवत्तेनुसार प्रवेश करण्यात यावेत.

३. ज्या विद्यार्थ्यांनी यापुर्वी केंद्रिभुत प्रवेश प्रक्रियेमधुन (CAP I, II, III) प्रवेश निश्चित केले आहेत असे विद्यार्थी उपरोक्त प्रवेश फेरीसाठी पात्र ठरणार नाहीत.

तरी, याबाबत कळविण्यांत येते की, आपल्या अधिपत्याखालील सर्व शासकीय/ अशासकीय अनुदानित व स्वायत्त संस्थाच्या निदर्शनास सदर बाब आणुन प्रवेश प्रक्रिया पुर्ण करुन घ्यावी.

(डॉ सुभाष महाजन)
प्र. संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य

प्रत:- १. संचालक, महाराष्ट्र तंत्रशिक्षण परिक्षा मंडळ, बांद्रा, मुंबई यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

२. कार्यासन क्र. ३, मुख्य कार्यालय, मुंबई यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी रवाना.